# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, डिसेंबर ३०, २००६/पौष ९, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—मध्य उप विभाग

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २००६

#### आदेश

क्रमांक रानिआ./मनपा. २००६/प्र.क्र.१७/का.५.— ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३-झेडए नुसार राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे ;

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मोकळ्या, स्वतंत्र व निष्पक्ष वातावरणात पार पाडाव्यात यासाठी आदर्श आचारसंहितेचे आदेश दिनांक २९ मार्च २००४ रोजी काढलेले आहेत व त्या आदेशांचा उद्देश निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना समान पातळीवर निवडणूक लढविता यावी हा आहे ;

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक रानिआ./मनपा./२००६/प्र.क्र.१७/का.५, दिनांक १९ सप्टेंबर २००६ अन्वये आदेश काढून विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उमेदवारांनी निवडणुकांमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा विहित करण्यात आलेली आहे ;

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी आदेश क्रमांक एसईसी/एमसी/२००४/सीआर-२६/डी-५, दिनांक २० नोव्हेंबर २००४ अन्वये राजकीय पक्षांच्या नोंदणीस प्रारंभ केला आहे ;

ज्याअर्थी, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मोकळ्या, स्वतंत्र व निष्पक्ष वातावरणात पार पाडणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पैसा व ताकद यांचा वापर नाहीसा व्हावा असे केल्याने निवडणुका स्वतंत्र व मोकळ्या वातावरणात पार पडू शकतील व निवडणुकांमध्ये पारदर्शकता येईल असे राज्य निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टाला बाधा आणणारी निवडणुकीमधील विशेषतः सार्वत्रिक निवडणुकीमधील एक बाब राज्य निवडणूक आयोगाच्या लक्षात आली आहे, ती म्हणजे



[ किंमत : रुपये २४.०० ]

315

महाराष्ट्र राज्यात राजकीय पक्षाद्वारे करण्यात येणारा खर्च राजकीय पक्षाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रचारावर, पोस्टर्सवर, विविध सभांवर केला जातो व हा खर्च उमेदवारांच्या खर्चामध्ये दाखविण्यात येत नाही. भारत निवडणूक आयोगाने अशी तरतूद केली आहे की, पक्षातर्फे करण्यात येणारा खर्च हा उमेदवारांच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात येत नाही. परंतु, राज्य निवडणूक आयोग व भारत निवडणूक आयोग यांच्यामध्ये जो फरक आहे तो असा की, सर्व पक्ष भारत निवडणूक आयोगाला दरवर्षी जमाखर्चाचा ताळमेळ सादर करीत असतात. जरी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी राजकीय पक्षांच्या नोंदणीस सुरुवात केली आहे तरीही पक्षाच्या जमाखर्चाचा ताळमेळ राज्य निवडणूक आयोगाला सादर केला जात नाही. महाराष्ट्रात नोंदणीकृत पक्षांनी उभे केलेले उमेदवार व अपक्ष उमेदवार यांना समान पातळीवर निवडणूक लढविता येणे शक्य व्हावे म्हणून राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या प्रचारावर केलेला खर्च म्हणजे पक्षातर्फे घेण्यात येणाऱ्या सभा, पोस्टर्स, बॅनर्स, प्रचार फेरी यावर होणारा खर्च त्या पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांमध्ये विभागून दाखवावा असे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे ;

त्याअर्थी, भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १८अ (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १४ (४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ च्या कलम ९ब (४), महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०अ (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग असे आदेश देत आहे की, महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुकांमध्ये राजकीय पक्षामार्फत जो खर्च करण्यात येतो तो त्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्या पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांमध्ये कोणकोणत्या प्रमाणात वाटून दाखविण्यात यावा हे महानगरपालिकांच्या निवडणुकीत संबंधित महानगरपालिका आयुक्त, नगर परिषदा/नगर पंचायती यांच्या निवडणुकीत संबंधित जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत निवडणुकीत जिल्हाधिकारी व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवावे. तसेच खर्चाची माहिती पुढील वेळापत्रकानुसार देण्यात यावी :—

(१) आचारसंहिता सुरू झाल्यानंतर २० दिवसांनी

(२) आचारसंहिता सुरू झाल्यानंतर ३५ दिवसांनी

(३) निकाल लागल्यानंतर ३ दिवसांत

सर्व पक्षांवर राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक एसईसी/एमसी/२००४/सीआर-२६/डी-५, दिनांक २० नोव्हेंबर २००४ मधील परिच्छेद ९ अनुसार राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे नोंदणीकृत पक्षांवर बंधनकारक आहे. जे पक्ष वरील सूचनांचे पालन करणार नाहीत त्यांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोग घेऊ शकतो.

नन्द लाल,<br>
राज्य निवडणूक आयुक्त,<br>
महाराष्ट्र.

प्रति,<br>
सर्व महानगरपालिका आयुक्त,<br>
सर्व जिल्हाधिकारी,<br>
सर्व विभागीय आयुक्त,<br>
सर्व नगरपरिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी,<br>
सर्व तहसीलदार,<br>
राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेले सर्व राजकीय पक्ष,<br>
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी.

316

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई